|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

**(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ)**

जा.क्र.कबचौउमवि/७-अ/श्रेणी सुधार/३७३८/२०२४ दि.१०/१२/२०२४

**अत्यंत तातडीचे**

प्रति,

(१) मा.प्राचार्य/ मा.संचालक,कबचौउमविशी संलग्नीत सर्व महाविद्यालये/ मान्यता प्राप्त परिसंस्था

(२) मा.संचालक/ मा.विभागप्रमुख, कबचौउमवि अंतर्गत सर्व शैक्षणिक प्रशाळा/ शैक्षणिक विभाग यांना ----

**विषय:- अध्यादेश १७४ नुसार श्रेणी / गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत नाव नोंदणी व परीक्षा अर्जासंदर्भात**

**संदर्भ:-** जा.क्र.कबचौउमवि/७-अ/श्रेणी - गुणवत्ता सुधार सुधारीत नियमावली/३९३६/२०२३, दि.२५/०९/२०२३ अन्वये निर्गमित केलेली सुधारीत नियमावली.

महोदय/महोदया,

वरील विषयास अनुसरुन कळविण्यांत येते की, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परिक्षेत्रात असलेली सर्व संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/ विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा /विद्यापीठ शैक्षणिक विभाग/ विद्यापीठ उपकेंद्र यामध्ये शिकविल्या जाणाऱ्या सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी श्रेणी / गुणवत्ता सुधार योजनेंतर्गत उपरोक्त संदर्भीय क्रमांकान्वये सुधारीत नियमावली लागू करण्यात आलेली असून, सदर नियमावली विद्यापीठाच्या *www.nmu.ac.in* या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर सुधारीत नियमावलीच्या अनुषंगाने ज्या विद्यार्थ्यांना अध्यादेश १७४ नुसार श्रेणी / गुणवत्ता सुधार योजनेंतर्गत नोंदणी करावयाची आहे, त्यांनी ज्या महाविद्यालय /परिसंस्था / शैक्षणिक प्रशाळा /शैक्षणिक विभाग /विद्यापीठ उपकेंद्र मधून पदवी / पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण केली आहे, त्या महाविद्यालय/परिसंस्थेच्या/ शैक्षणिक प्रशाळांच्या /शैक्षणिक विभागांच्या / विद्यापीठ उपकेंद्राच्या मा.प्राचार्य / संचालक /विभाग प्रमुख यांच्या मार्फत श्रेणी / गुणवत्ता सुधार योजनेच्या सुधारीत नियमावलीनुसार व **वाढीव मुदतीसह** आवश्यक ती सर्व दस्तऐवजे व शुल्कांसह आपले प्रस्ताव खालील नमूद केलेल्या तक्त्यात दिलेल्या मुदतीत सादर करावेत. तसेच सदर नोंदणी प्रस्तावांसोबतच माहे मार्च/एप्रिल/मे/जून,२०२५ (उन्हाळी) मध्ये होणाऱ्या परीक्षेचा परीक्षा अर्ज श्रेणी /गुणवत्ता सुधार योजनेच्या नियमावलीत नमूद केलेल्या विहीत शुल्कासह खालील मुदतीत विद्यापीठाकडे सादर करावेत.

| **नाव नोंदणी व परीक्षा अर्ज सादर करणेसाठी मुदत** | |
|---|---|
| **विना विलंब शुल्क** | **विलंब शुल्कासह** |
| **दि.१६/१२/२०२४ ते ३१/१२/२०२४** | **दि.०१/०१/२०२५ ते १५/०१/२०२५** |

अपूर्ण दस्तऐवज किंवा अपूर्ण माहिती असलेला नोंदणी अर्ज / परीक्षा अर्जावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही. तसेच सदर बाबत भरलेले शुल्क परत केले जाणार नाही.

तरी उपरोक्त बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देवून नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करुन, विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,
सही/-
**(प्रा.योगेश एन. पाटील)**
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीसाठी :-

१) मा.कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगांव २) मा.प्र.कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव.
३) मा.कुलसचिव कार्यालय, कबचौ उमवि, जळगाव ४) मा.वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव.
५) यंत्रणा विश्लेषक/ विशेष कार्य अधिकारी, परीक्षा (संगणक) विभाग, कबचौउमवि, जळगाव.
६) उपकुलसचिव, परीक्षा व मूल्यमापन विभाग, कबचौउमवि, जळगाव. ७) उपकुलसचिव (अ.का.), परीक्षा व मूल्यमापन विभाग, कबचौउमवि, जळगाव.
८) परीक्षा व मूल्यमापन विभागातील सर्व विद्याशाखांचे नियंत्रक अधिकारी, कबचौउमवि, जळगाव.
९) जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव

१०) समन्वयक, ई-सुविधा केंद्र, कबचौउमवि, जळगाव.

**हिवाळी परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यानंतर पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी प्रसिध्द करण्यात येणाऱ्या परीक्षा वेळापत्रकात विविध वर्गांसाठी दिलेल्या मुदतीत नाव नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरुन विद्यापीठास सादर करावेत.**